ARTHA
Pocna 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ पुणें, बुधवार तारीख २४ सप्टेंबर, १९५२ अंक ३९

## विविध माहिती

**मच्छीमारीच्या धंद्याचा अभ्यास**—भारतामधील चार सरकारी अधिकारी डेन्मार्कच्या मच्छीमारीच्या धंद्याचा अभ्यास करण्यासाठी डेन्मार्कला गेले आहेत. ह्या धंद्याला लागणाऱ्या सामानसुमानाची शक्य झाल्यास खरेदी करण्याचाही त्यांचा हेतु आहे.

**नेहरूंच्या पुस्तकाचें ५० वें भाषांतर**—पं. नेहरू ह्यांच्या 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' ह्या पुस्तकाचें युगोस्लाव्हियांतील एका प्रांतिक भाषेत भाषांतर करण्यांत आलें असून तें लवकरच प्रसिद्ध करण्यांत येणार आहे. हें भाषांतर ह्या पुस्तकाचें ५० व्या भाषेंतील आहे. भाषांतराला नेहरूंची अनुमति मिळण्यासाठी खटपट सुरू आहे.

**इराणसाठी जर्मन यंत्रें**—इराणच्या तेलाच्या कारखान्याचें राष्ट्रीयीकरण करण्यांत प्रमुख भाग घेतलेले सीनेटर मक्की हे सध्यां प. जर्मनींत दौऱ्यावर आहेत. इराणच्या औद्योगीकरणासाठीं जरूर असणारी यंत्रसामुग्री मिळविण्यासाठीं जर्मन कारखानदारांशीं त्यांच्या वाटाघाटी झाल्या.

**फोर्ड फौंडेशनची मदत**—बिहारमध्यें समाजविकास-केंद्राच्या दोन योजना अनुक्रमें पाटणा आणि मुझफरपूर येथें उघडण्यांत यावयाच्या आहेत. ह्या दोन केंद्रांत कार्यकर्त्यांना शिक्षण देण्यांत यावयाचें आहे. भारत सरकारनें फोर्ड फौंडेशनकडून मिळणाऱ्या मदतींतून १३,७५,००० रुपये वरील केंद्रांसाठीं मंजूर केले आहेत.

**पंजाबचा विक्रीकराचा कायदा**—पंजाब सरकारचा विक्रीकराचा कायदा घटनेच्या २२६ कलमाप्रमाणें अवैध असल्याचा दावा करणारा अर्ज पंजाब हायकोर्टांत करण्यांत आला आहे. एका कंपनीनें हा अर्ज केला असून आपण तयार करीत असलेलें खाण्याचें तेल विक्रीकराला पात्र नाहीं, असें त्यांत म्हटलें आहे.

**बंगलोरमधील टेलिफोनचा कारखाना**—ऑगस्ट १९५२ अखेर बंगलोर येथील टेलिफोनच्या सरकारी कारखान्यांत ५४,९२१ टेलिफोन्स तयार झाले. प्रथम कारखान्याची वार्षिक उत्पादनक्षमता २५,००० होती; पण आतां ती ४०,००० पर्यंत वाढविण्यांत आली आहे. पुरेसा कच्चा माल मिळाल्यास दरवर्षी ५,००,००० टेलिफोन्स पुढील वर्षापासून तयार होऊं शकतील.

**महागाई भत्त्याचा खर्च**—भारतीय सरकार आपल्या नोकरांना महागाई भत्ता म्हणून दरवर्षी ६० कोटी रुपये देतें. ह्या रकमेपैकीं ४० कोटी रुपये ज्या नोकरांना मूळ पगार दरमहा ५० रुपयापेक्षां कमी आहे, त्यांच्यासाठीं खर्च होतात.

**प्राणिसंग्रहालयासाठीं वाघ**—न्यूयॉर्क येथील प्राणि-संग्रहालयांत ठेवण्यासाठीं वाघाचे दोन बच्चे आणि २०० माकडें नुकतीच कलकत्त्याहून विमानानें रवाना करण्यांत आलीं. वाघाचीं पिलें ११ महिन्यांचीं आहेत. त्यांच्यासाठीं कराची, कैरो व आमस्टरडॅम येथें मांस मिळण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे.

**प्राचीन गव्हापासून आलेलें पीक**—इजिप्तमधील एक प्राचीन कबर खणत असतांना प्राचीन काळच्या एका गव्हाचें कणीस सांपडलें होतें. तें कणीस एका डॅनिश शेतकऱ्यानें आपल्या शेतांत बियाणें म्हणून वापरलें असतां प्रत्येक रोपाला ६ ते १२ कणसें आलीं आणि प्रत्येक कणसांत १६३ दाणे आले.

**रशिआला अधिक वर्गणी द्यावी लागणार**—संयुक्त-राष्ट्र-संघटनेला अमेरिका व ब्रिटन सध्यां जी वर्गणी देतात ती कमी करून रशिआनें अधिक द्यावी अशी शिफारस संघटनेच्या खास समितीनें केली आहे. अमेरिकेची वर्गणी ३६.९० टक्क्यांवरून ३५.१२ टक्के करण्यांत यावी आणि रशियाची ९.८५ टक्क्यांवरून १२.९८ टक्के करण्यांत यावी अशी ही शिफारस आहे.

**शारीरिक शिक्षणाची योजना**—दिल्ली राज्यांतील भारत-सेवक समाजानें राज्यांत ठिकठिकाणीं योगासनें शिकविण्यासाठीं आश्रम काढण्याचें ठरविलें आहे. दिल्ली येथें दोन आश्रम उघडण्यांत येणार आहेत. शिक्षण मोफत देण्यांत येणार आहे. स्त्रियांसाठीं स्वतंत्र केंद्र उघडण्यांत येईल.

**रशिआ—पाकिस्तान करार**—रशिआ आणि पाकिस्तान ह्यांच्या दरम्यान झालेल्या पहिल्या ऐनजिनसी व्यापाराच्या करारावर नुकत्या सह्या झाल्या. रशिआ पाकिस्तानला १,५०,००० टन गहू पुरवून त्याच्या बदला २२,००० टन ताग आणि १३,१५० टन कापूस घेणार आहे.

**अणुशक्तीपासून वीज**—अणुशक्तीपासून वीज उत्पन्न करणयाची यंत्रसामुग्री येत्या चार वर्षांत तयार होईल, असा अंदाज एका प्रमुख ब्रिटिश शास्त्रज्ञानें केला आहे. निर्माण होणारी वीज केवळ प्रायोगिक स्वरूपाची न रहातां कारखान्यासाठीं वापरतां येईल असेंहि त्यांचें मत आहे.

**धरणीकंपाचें भाकित**—सोव्हिएट शास्त्रज्ञांनीं धरणीकंप कोठें होईल तें आगाऊ वर्तविण्याची क्रिया हस्तगत केली असल्याची बातमी आहे. सोव्हिएट शास्त्रज्ञ मि. गुबिन हे गेलीं २० वर्षें मध्य-आशिआंत बसणाऱ्या भूकंपांचा अभ्यास करीत होते. धरणीकंपाची शक्यता दाखविणारा एक नकाशा ते तयार करीत आहेत.

## सहकारी बँकांचा गेल्या वर्षाचा अनुभव

(पु. पां. खोखले)

ईश्वरेच्छा जशी मानलीच पाहिजे तशाच राज्ययंत्रणेच्या लहरीही सांभाळल्याच पाहिजेत, असा प्रसंग नागरिक नीतीनें प्रत्यकावर येतो. अपरिहार्य असेल तेवढाच विलंब राज्ययंत्रणेकडून व्हावा असा खरोखर दंडक असतां व जीवनाच्या सर्व क्षेत्रांत सहकारी संघटना निर्माण झाल्या पाहिजेत असा घोष चालला असतां काम वाढल्यामुळें (आळसामुळें, दुर्लक्षामुळें अगर अन्य कारणामुळें बहुधा नसावें!) सहकारी खात्याकडूनही लवादाचें निकाल मिळण्यास, मार्गदर्शन होण्यास व निकडीच्या कामांचीही (पांच नव्हे!) उत्तरें येण्यास दहा दहा महिन्यांचा अवधी अपुरा पडावा, हें विषाद उत्पन्न करणारें नाहीं काय?

### कर्जांत वाढ

निरीक्षकांच्या हें सहज लक्ष्यांत येतें कीं, १९५०-५१ चे मानानें १९५१-५२ हें वर्ष बँकांना अवघडच गेलें. १९४८ सालीं बँकांतील ठेवींनीं जसा उच्चांक गांठला होता तसा या वर्षी बँकांतील कर्जांनीं उच्चांक गांठला; सरकारी रोख्यांतील गुंतवण आणि हातांतील पैसा बँकांचा कमी झाला; बाजारच्या महागाईनें दुकानांच्या चालू भांडवलासाठी मध्यम व्यापारी, बँकांवरच भर देऊन बसूं लागलेच होते आणि मोठे व्यापारी "राष्ट्राच्या अंतर्गत किंमती उतरूं लागल्या तरी आंतरराष्ट्रीय किंमती चढायाच्याच अशा अपेक्षेनें साठे करूं लागले," त्यामुळें मंदीच्या मोसमांतही बँकांकडे कर्जास सारखी मागणी होत राहिली, ती बँका भागवूं शकल्या नाहींत. गेल्या सालच्या निवेदनांत म्हटल्याप्रमाणें, १९४९ सालापासून ठेवींच्या ७०% हूनच काय, १००% हूनही जास्त कर्जें बँकांनीं दिलीं होतीं तीं रिझर्व्ह बँकेचे अहवालानें नुकतेंच जाहीर केलें आहे कीं अनुक्रमें १५२ व १३८ बँकांनीं दिलीं होतीं; त्यांचा उतार १९५०-५१ सालीं सरासरीनें ६५% वर व १९५१-५२ सालीं ६४% वर आला आहे. त्यामुळें एकंदरीनें भारतीय बँकांचा सुदृढपणा कायम आहे फार काय, एवढ्या साऱ्या वावटळींतून सहकारी बँका, अर्थात, आपलीही बँक व्यापाऱ्यांच्या व सभासदांच्या प्रेमळ सहकाराचे जोरावर आपल्या प्रगतीची धीमी पावलें नेटानें टाकीत राहिली, हें कोणालाही अभिमानास्पदच वाटेल.

### रिझर्व्ह बँकेची उपाययोजना

कोरियन युद्धानंतरच्या काळांत बँकांकडील कर्जे वाढत गेलीं तीं एवढ्या मोठ्या प्रमाणांत कीं उत्पादनावर आणि व्यापारावर दुष्परिणाम होऊं न देतां बँकेकडील कर्जाच्या "पती"ची वाढ तातडीनें आवाक्यांत आणणें, बँकेकडील गिऱ्हाइकांच्या पतीचें दीर्घकाल नियंत्रण करणें आणि नाणेबाजारांत पतीला लवचिकपणा आणणें हे तीन हेतु धरून रिझर्व्ह बँकेनें १९३५ पासून १७ वर्षे कायम असलेला आपला व्याजाचा दर ३% वरून ३½% वर नेला आणि सरकारी रोख्यांची खरेदी न करतां त्यांचे तारणावर कर्जे देण्याचें ठरविलें.

### तिचा परिणाम

नोव्हेंबर १९५१ च्या मध्यास रिझर्व्ह बँकेनें घेतलेल्या या निर्णयानें, सरकारी रोख्यांच्या किंमती खाड खाड कमी झाल्या आणि यंदांपासून निव्वळ नफ्याच्या १०% तरी रक्कम या रोख्यांच्या तूट रकमेच्या भरपाईची तरतूद म्हणून काढून ठेवण्याबद्दल जानेवारीपासून अधिकारी व्यक्तींची परिपत्रकें निघूं लागलीं. बँका-बँकांतील ठिकाविण्याच्या कर्जांवरील व्याजांचे दर वाढले आणि खुद्द सरकारला सावकारी नियंत्रण कायद्यांतील ६½% व व्याजाची कमालमर्यादा ९% व १२% वर न्यावी लागली!!! हातउसने घेतलेल्या पैशांचें खाजगी व्यवहारांतील गुपचूप भाडेंही २४% ते ३६% वर गेल्याचा आपल्या इकडील भागांत सारखा बोभाटा होता!!! अशा स्थितींत सहकारी बँका आपल्या ब्रीदाला जागल्या म्हणूनच एकंदरीनें त्यांच्या सरकारी रोख्यांची एक कोटीनें वाढ झाली; ठेवी दहा कोटींनीं वाढल्या तरी कर्जे तेरा कोटींनीं वाढून त्यांचें प्रमाण ६९.६% पडूं लागलें; कर्जांच्या परतफेडीची सुलभता गेली असली तरी निराशा होण्याइतकी कठिणाईही भासली नाहीं.

बँकेचे निधी, कार्यक्षमता व निकोपपणा यांत कसलीही कमतरता पडूं द्यावयाची नाहीं, अशी दक्षता कराड अर्बन बँकेनें घेतलेली आहे, हें ताळेबंदावरून आपणां सर्वांच्या लक्ष्यांत येईलच. लेखापरीक्षकांच्याही ध्यानांत ते आल्यामुळेंच त्यांनीं "बँक चांगली प्रगति करीत आहे आणि आदर्श नागरीपेढी म्हणून तिचें उच्च स्थान कायम आहे" असा आपला अभिप्राय प्रगट केला आहे.

(कराड अर्बन को. बँक लि. च्या नियामक मंडळातर्फे भागीदारांस निवेदन.)

---

### भांडवल उभारणीचे अर्ज : नवी प्रश्नपत्रिका

कंपन्यांकडून भांडवलविक्रीसाठी मान्यता देण्याकरतां आलेले विनंती-अर्ज लवकर निकालांत काढतां यावेत या दृष्टीनें जानेवारी १९४६ पासून चालू असलेला प्रश्नपत्रिकेचा नमुना आतां सुधारण्यांत आला आहे. हा नवीन नमुना अधिक व्यापक स्वरूपाचा असल्यानें कंट्रोलर ऑफ कॅपिटल इश्युज यांना अर्जावर पूर्वीपेक्षां अधिक लवकर निर्णय देतां येईल. मागील प्रश्नपत्रिकेंतील प्रश्नांनुसार सादर केलेली माहिती पुरेशी नसल्यानें आणखी पत्रव्यवहार वाढून विलंब लागे.

प्रश्नपत्रिकेचा सुधारलेला नमुना मागील नमुन्यापेक्षां कांहीं बाबतींत वेगळा आहे. पूर्वी केलेल्या अर्जाचा तपशील देतांना अर्जदारानें यापुढें त्यास माजी संस्थानांनीं मान्यता दिली असल्यास, त्यासंबंधींचा तपशील सादर करावा लागेल. तसेंच इंडियन कंपनीज ॲक्टांतील तरतुदी प्रवर्तकांकडून पुऱ्या करण्यांत येतील असें निश्चित निवेदन अर्जासोबत जोडलेलें असलें पाहिजे व विक्रीस काढलेलें भांडवल आणि तें खपविण्यासाठी कंपनीच्या प्रवर्तकांनीं अथवा त्यांच्या मित्रांनीं खाजगीरीत्या केलेली व्यवस्था याबाबतची माहितीही पाठवावी लागेल.

रहिवाशांव्यतिरिक्त इतरांना दिलेल्या भागांची संख्या आणि त्यांची एकूण किंमत, स्वामित्वाकरितां (रॉयल्टी) कांहीं रक्कम द्यावयाची असेल तर तो आंकडा, तांत्रिक साह्याबाबतच्या व भारतीयांना शिक्षण देण्याविषयींच्या व्यवस्था, यांचीही माहिती सादर करावी लागेल.

सुधारलेल्या नमुन्यानुसार, औद्योगिक कारखान्यांना आपली योजना आणि यंत्रसामुग्रीच्या आयातीसाठीं लागणारा परकीय हुंडणावळ यांचाही तपशील द्यावा लागेल. नमुन्यांत केलेल्या इतर दुरुस्त्यांनुसार पाठवावयाच्या माहितींत विक्रीस काढावयाचे रोखे आणि राखीव निधी, इत्यादींच्या तपशीलाचा अंतर्भाव होतो.

नवीन विमाकंपन्यांबाबत आणखी एक प्रश्न नमुन्यांत समाविष्ट करण्यांत आला आहे. तसेंच, माजी संस्थानांतून येणाऱ्या अर्जासंबंधींच्या पूर्वीच्या नमुन्यांतील ब विभाग नवीन नमुन्यांतून गाळून टाकला आहे.

# अर्थ

बुधवार, ता. २४ सप्टेंबर, १९५२





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## औद्योगिक सहकारी संस्थांना रिझर्व्ह बँकेची मदत

उत्तर-प्रदेश सरकारनें रिझर्व्ह बँक ऑफ इंडिआला अशी सूचना केली आहे कीं, बँक शेतीच्या सहकारी सोसायट्यांना जशी सवलतीच्या कमी दरानें कर्ज देते, तसेंच कर्ज औद्योगिक सहकारी सोसायट्यांनाही तिनें द्यावें. उत्तर-प्रदेशांत शेतीच्या खालोखाल ग्रामोद्योगांतच हजारों कामगार आपले पोट भरीत असतात. ह्यांच्यापैकीं कांहीं ग्रामोद्योगांतच पूर्णपणें गुंतलेले आहेत; तर इतर फावल्या वेळांत काम करून आपल्या उत्पन्नांत भर घालतात. उत्तर-प्रदेशांत निरनिराळे अनेक ग्रामोद्योग असले तरी त्या सर्वांत विणकरांचा व्यवसाय हा फार मोठा आहे. ह्या व्यवसायांत २ लाख कामगार कायमचे गुंतलेले असून ६·८ लाख कामगार फावल्या वेळांत काम करणारे असे आहेत. राज्यांतील ¼ लोकसंख्येला लागणारें कापड विणकर पुरवतात. तथापि हे विणकर जुन्या विचारसरणीचे, दरिद्री, तांत्रिक मार्गदर्शन न मिळणारे आणि व्यापाऱ्यांवर व दलालांवर अवलंबून असणारे असे आहेत. विणकरांनीं स्वतःच कच्चा माल घेऊन कापड बनविलें अगर दलालांकडून घेऊन बनविलें तरी तें त्यांच्या कचाट्यांतून सुटूं शकत नाहींत. त्यांच्या कापडाला फारच कमी किंमत देण्यांत येते. औद्योगिक सहकारी सोसायट्या स्थापन केल्यास मात्र त्यांची ही दैन्यावस्था दूर होण्यासारखी आहे. अशा सहकारी संस्था भांडीं, मातकाम, कातड्याचें काम इत्यादि व्यवसायांत स्थापन झालेल्या आहेत. ह्या संस्था कामगारांना कच्चा माल पुरवितात, धंद्याला लागणारें इतर साहित्य पुरवतात, थोड्या व्याजाच्या दरानें कर्जें देतात व त्यांच्या मालाच्या विक्रीचीही व्यवस्था करतात. त्यामुळें कामगारांना वेतनाहि अधिक चांगलें मिळतें आणि त्यांच्या मालाला किंमतही बरी येते.

औद्योगिक सहकारी संस्थांत विणकरांच्याच संस्था अधिक आहेत. १९५०-५१ सालीं त्यांची संख्या ६५० पर्यंत वाढली. त्याशिवाय ४३ मध्यवर्ती सहकारी संस्था आहेत त्या वेगळ्याच. वरील सालीं ह्या सोसायट्यांचें खेळतें भांडवल अनुक्रमें ३४ लाख रुपये आणि २०·४१ लाख रुपये होतें, आणि त्यांना झालेला नफा ३ लाख रुपये होता ३२ संस्थांत प्रत्यक्ष उत्पादनाचें कार्य चालूं होतें; इतर संस्था सुताचें वाटप करणें आणि कापडाच्या विक्रीची व्यवस्था करणें हीं कामें करीत होत्या. ह्या व्यवसायाची वाढ अधिक चांगल्या पद्धतीनें व्हावी म्हणून राज्य सरकारनें १९५०-५१ सालीं एक योजना आखली होती. ह्या योजनेप्रमाणें १२ जिल्ह्यांसाठीं मिळून १,४०,००० रुपये खर्च करण्यांत आले. विणकरांच्या सहकारी संस्थांतून कापडाचें उत्पादन करून त्यांच्या विक्रीची व्यवस्था करण्याच्या प्रयत्नांत सरकारला चांगलें यश आले. त्यामुळें इतर प्रकारच्या ग्रामोद्योगांताहि ह्याच पद्धतीच्या सहकारी संस्था काढण्यांत याव्यात अशा सूचना करण्यांत येत आहेत. विणकरांखेरीज इतर धंद्यांत गुंतलेल्या कामगारांच्या १०० सहकारी संस्था राज्यांत आहेत. रिझर्व्ह बँक शेतीच्या सहकारी संस्थांना खास सवलत म्हणून कमी व्याजाच्या दरानें कर्जें देते, अशाच प्रकारचीं कर्जें इतर प्रकारच्या सहकारी संस्थांना देण्यांत आलीं तर राज्यांतील ग्रामोद्योगांची भरभराट होईल असें मत व्यक्त करण्यांत येत आहे. रिझर्व्ह बँकेला उत्तर-प्रदेश सरकारतर्फें करण्यांत आलेली सूचना विचाराई असून ती सावधगिरीनें अंमलांत आणणें इष्टच ठरेल.

---

### डॉलर्सच्या तुटवड्याचें दुखणें

जागतिक बँकेची बैठक नुकतीच मेक्सिको सिटी येथें भरली होती. ह्या बैठकीचें नित्याचें काम चालू असतांनाच, ब्रिटननें डॉलर्सचा तुटवडा संपविण्यासाठीं एक योजना सभासद-राष्ट्रांत प्रसृत केल्याची बोलवा आहे ह्या योजनेचा तपशील अमेरिकेला मिळाला असून योजना अमेरिकन प्रतिनिधींना मान्य नसल्याचेंहि समजतें योजना अंमलांत आली तर अमेरिकेला अधिक डॉलर्स खर्चावे लागतील असें त्यांचें म्हणणें आहे. परंतु ज्या देशांना डॉलर्सचा तुटवडा पडला आहे त्यांच्या अर्थमंत्र्यांना आणि बँकवाल्यांना तिनें भुरळ पडली आहे असें म्हणतात. योजनेचें स्वरूप 'वॉल स्ट्रीट जर्नल' ह्या अमेरिकन नियतकालिकानें थोडक्यांत पुढीलप्रमाणें दिलें आहे. समजा, अमेरिका अगर बेल्जम ह्या देशानें निर्यातीपेक्षां आयात कमी ठेवण्याचें धोरण सारखें अवलंबलें आणि त्यामुळें दुसऱ्या देशांना डॉलर्सचा अगर फ्रँक्सचा तुटवडा पडूं लागला. अशा प्रसंगीं जागतिक बँकेकरवीं त्या देशाला 'दोषी' ठरविण्यांत येईल आणि मग 'दोषी' ठरविलेल्या देशाला पुढीलपैकीं एक अगर सर्व गोष्टी कराव्या लागतील (१) आपल्या आयात-जकाती कमी करणें, (२) ज्या देशाला परकीय हुंडणावळीचा तुटवडा पडला असेल त्या देशांत भांडवल गुंतविण्यास आपल्या नागरिकांना उत्तेजित करणें आणि (३) तुटवडा पडलेल्या देशाला कर्ज अगर देणग्या देणें. दरम्यान इतर देश अमेरिका अगर बेल्जम अशा 'दोषी' देशाच्या मालाला सापत्न भावानें वागवितील आणि इतर देशांच्या मालाला सवलती देतील. ही योजना अंमलांत येण्याची शक्यता फारशी नाहीं. कारण, अमेरिकेच्या मदतीवर अवलंबून असणाऱ्या देशांकडूनच ती मंजूर करवून घ्यावयाची आहे अर्थात, अमेरिकेच्या आर्थिक दडपणापुढें अशा देशांना नमावें लागेल.

---

**भूगर्भशास्त्रज्ञांची परिषद**—अलजीअर्स येथ भूगर्भशास्त्रज्ञांची एक आंतरराष्ट्रीय परिषद नुकतीच भरली होती. परिषदेला ७८ राष्ट्रांचे मिळून १,१०० प्रतिनिधी हजर होते. ब्रिटन, फ्रान्स, रशिआ व जपान ह्या राष्ट्रांचे प्रतिनिधी त्यांत होते. सहाराची भूरचना आणि आफ्रिकेंतील तेलाच्या खाणी ह्या विषयांची चर्चा करण्यांत आली.

**कॅन्सर जंतूमुळेंच होतो ?**—अमेरिकन केमिकल सोसायटीच्या बैठकींत कॅन्सर ह्या रोगाविषयीं महत्त्वाची माहिती प्रकट करण्यांत आली आहे. शास्त्रज्ञांच्या मतानें कॅन्सरच्या रोगाला कारणीभूत होणारा एक जंतू असून तो ओळखतां येतो आणि त्याचा प्रतिकाराहि करतां येतो. अजून ही माहिती अपूर्णावस्थेंत आहे.

### जमाखिंडी अर्बन को. बँक लि.

बँकेच्या वसूल भांडवलांत समाधानकारक वाढ झाली आहे. "बाजारास भांडवलाचा पुरवठा ठेव रकमेंतून ठेवीदारांमार्फत वैयक्तिक रीत्या झाला असणें स्वाभाविक आहे आणि त्याचाच परिणाम ठेवींच्या घटींत झालेला दिसून येतो. तथापि, खातेदारांच्या संख्येंत झालेली वाढ पहातां, एकंदरीनें बँकेवरील ठेवीदारांचा विश्वास वाढत्या प्रमाणांतच आहे." बँकेस निव्वळ नफा २३,२९० रु. झाला. कापड दुकानाच्या नफ्याचा (७ हजार रु.) विनियोग सेफ डिपॉझिट व्हॉल्टच्या योजनेकडे करण्याची योजना वार्षिक सभेपुढें मांडण्यांत येईल. ६¼% डिव्हिडंड वांटण्यास १२,००० रु. लागतील. जमखंडी व मुधोळ ह्या तालुक्यांतर्फे बँकेशी संबंधीत श्री. जत्ती व श्री. शहा हे विधिमंडळाच्या निवडणुकींत निवडून आले व पुढें श्री. जत्ती हे उपमंत्री नेमण्यांत आले. त्यांचा सत्कार बोर्डानें केला. बँकेचे माजी चेअरमन, श्री. व्यं. श्री. आनोसिंही हे १९ जुलै, १९५२ रोजीं दिवंगत झाले, त्यांच्या कार्याबद्दल बोर्डानें कृतज्ञता व्यक्त केली आहे. (प्रेसिडेंट व्ही. एस. फडके, बी. एस्सी, एल्एल्. बी., चेअरमन एस. एम. अथाणि, व्हा. चेअरमन आर. जी. दाते, मॅनेजर एम. डी. खाडिलकर).

---

### श्री लक्ष्मी को. बँक लि., सोलापूर.

बँकेचें शेअर भांडवल, रिझर्व्ह व इतर फंड, नफा, इत्यादींत सालोसाल वाढ होत आहे. ठेवींचा आकडा कायम राहिला आहे. बँकेची थकबाकी अहवालाचे वर्षीं बरीच वसूल झाली आणि ती २,५०० रु. नीं कमी झाली. त्यामुळें फायद्याचा आंकडाहि वाढला. ४,०५७ रु. नफा झाला, त्यांपैकी ५% डिव्हिडंडला २,१२३ रु. लागतील. कापड दुकान व्यवस्थेशीर व फायदेशीर चालू आहे. (प्रेसिडेंट प. रे. कोसंदर ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर शं. गं. बंदगुल. मॅनेजर: ना. धों. ढंके).

---

### बॉंबे प्रॉ. को. लँड मॉर्गेज बँक लि.


बँकेनें अहवालाचे वर्षीं शेतकी-कर्जे १८,७६,२५७ रु. चीं दिलीं. वसुलीचें प्रमाण उतरलें आहे. कर्जांची मागणी वाढत आहे, ती पुरविण्यसाठीं पैसा उभारण्यास सरकारनें मदत करावी, अशी डायरेक्टरांची सूचना आहे. ५० लक्ष रु. च्या ८ व्या डिबेंचर्सला सरकारी मंजुरी लवकरच मिळेल. गेल्या वर्षीं बँकेस ४८,२५६ रु. नफा झाला. ३½ डिव्हिडंडला २०,७८९ रु. लागतील.

---

### दि कॉसमॉस को. अर्बन बँक लि. पुणें

बँकेनें गतवर्षीपेक्षां थोडें कर्ज अधिक दिलें. कर्जफेडहि ४१ हजार रु. नीं जास्त झाली. थकबाकींत सोन्याच्या तारणावर दिलेल्या कर्जाची बाकी वाढली आहे, त्याचें कारण सोन्याचा घसरलेला भाव, हें होय. इमारत दुरुस्तीसाठीं ५,००० रु. वास्तुनिधींतून खर्च करण्यांत येणार आहेत. अहवालाचे वर्षीं बँकेस १७,९१७ रु. नफा झाला. ६¼% डिव्हिडंला ६९०० रु. लागतील. बँकेची मजबुती सालोसाल वाढत आहे आणि बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या भांडवलाचें एकूण खेळत्या भांडवलाशीं प्रमाण चांगलें आहे. (कार्याध्यक्ष: चिं. वा. भट. उप-कार्याध्यक्ष: शं. ल. ओगले. कार्यवाह: य. श्री. शालिग्राम.)


SAVE to help yourself and the NATION




THE SARASWAT CO-OPERATIVE BANK LTD.
GIRGAON, BOMBAY.
Branches: Dadar, Mahim, Poona & Belgaum



## ठेवी स्वीकारण्यांत येतात

ठेवींवर दरसाल दर शेंकडा ७½ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वी आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

**पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड**
शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,
१७२, गिरगांव रोड, मुंबई ४
टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता: 'PEDNECO' Bombay



## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

स्थापना १९३५ : शेड्यूल्ड बँक

| | | |
|---|---|---|
| वसूल झालेलें भांडवल | :: | रु. १६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | :: | रु. ५,६५,००० |
| एकूण खेळतें भांडवल | :: | रु. ३। कोटींचे वर |

संचालक मंडळ

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे (अध्यक्ष) | श्री. श्री. गो. मराठे (उपाध्यक्ष) |
| श्री. न. ग. पवार | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. फ. दो. पदमजी | श्री. मा. वी. शहा |
| श्री. शं. ल. किर्लोस्कर | श्री. भा. म. गुते |

बँकेच्या शाखा

मुंबई (फोर्ट, गिरगांव, दादर व कल्याण), पुणें (डेक्कन जिमखाना व खडकी), नाशिक, चाळिसगांव, धुळें, जळगांव, नागपूर, रत्नागिरी, कोपरगांव, हुबळी, सोलापूर, कोल्हापूर, द. हैद्राबाद, सांगली व अमरावती.

मुख्य कचेरी
लक्ष्मी रोड, पुणें २.

चिं. वि. जोग,
मॅनेजर.

## रिझर्व्ह बँकेच्या कार्याचा परिचय

### सावकारी पद्धति

भारतांत बँकिंगची विकासित झालेली पद्धति भूतकाळांत अस्तित्वांत असली तरी पाश्चात्य देशांत चालू आहे त्या आधुनिक अर्थाप्रमाणें मात्र ती अलिकडेच सुरू झाली आहे. मागील काळांतील या प्रकारची संस्था म्हणजे 'सावकार' ही असून देशांतल्या कांहीं विभागांत त्यांना महाजन असें संबोधण्यांत येतें. ते ग्रामीण जनतेला जरूर तों पैसा पुरवीत असत. वस्तुतः सध्यांही भारतांतील ग्रामीण विभागांत ९/१० कर्ज महाजनच पुरवितात. परंतु देशव्यापी व आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या सध्यांच्या वाढत्या अर्थव्यवस्थेच्या गरजा या महाजन संस्थेस पुरवितां येणार नाहींत. हें वैशिष्ट्य केवळ भारतापुरतेंच नसून औद्योगिक क्रांतीनंतर सर्व जगभरच तें दिसून आलें असून, अर्थव्यवस्थेच्या मूलभूत कल्पनेंतच बदल घडून आला. देशांतील औद्योगिक व शेतकी विस्ताराकरतां लागणाऱ्या कर्जावर नियंत्रण ठेवतां येईल आणि चलनवाढ न होऊं देतां उपलब्ध साधनसंपत्ति खेळती ठेवून जास्तींत जास्त फायदा मिळवितां येईल अशा प्रकारची एकादी यंत्रणा स्थापन करण्याची त्यामुळें गरज उत्पन्न झाली. भारतांत १९ व्या शतकांत अशा स्वरूपाच्या कांहीं थोड्या बँका चालू होत्या तरी विसाव्या शतकांतच या पद्धतीचा विकास झाला.

### मध्यवर्ती बँकेची स्थापना

भारतांतील बँकिंग पद्धति तौलनिकदृष्ट्या पहातां नवीनच आहे. परंतु रिझर्व्ह बँक तर त्याहून नंतर सुरू झाली आहे. १ एप्रिल १९५२ रोजीं त्या बँकेस सतरा वर्षे पूर्ण झालीं. १९२५ मध्यें नेमलेल्या 'रॉयल कमिशन ऑन इंडियन करन्सी ॲण्ड फायनान्स' या मंडळानें केलेल्या शिफारशींनुसार व १९३४ मध्यें रिझर्व्ह बँक ॲक्ट संमत झाल्यावर, १९३५ मध्यें रिझर्व्ह बँकेची स्थापना झाली. देशांत मध्यवर्ती बँकेच्या स्थापनेची जुनी मागणी अशा रीतीनें पुरी झाली. १९२१ मध्यें तीन प्रेसिडेन्सी बँका विलीन करून इंपिरियल बँक स्थापन करण्यांत आल्यानंतर तिचें पूर्ण सुसज्य अशा मध्यवर्ती बँकेंत रूपांतर होईल असें वाटलें होतें. आणि सरकारचे 'बँकर' राहण्यासारखी कांहीं कामेंही त्या बँकेनें केलीं, परंतु राष्ट्रीय प्रवृत्तीच्या भारतानें त्याऐवजीं स्वतःची दुसरी मध्यवर्ती बँक असावी असें ठरविलें. भारत सरकारनें या बँकेच्या भागीदारांना ( शेअर होल्डर्स ) नुकसान भरपाई देऊन व एकूण सर्व भागांचें भांडवल ताब्यांत घेऊन १९४९ मध्यें केलेलें तिचें राष्ट्रीयीकरण म्हणजे आर्थिक क्षेत्रांतील राष्ट्रीय आकांक्षेची परिणतीच होय.

### रिझर्व्ह बँकेचीं कामें

कोणत्याही देशांतील मध्यवर्ती बँकेचीं कामें सामान्यपणें पुढीलप्रमाणें असतातः—

( अ ) सरकारचें 'बँकर' म्हणून काम करणें.

( ब ) ही बँक व्यापारी बँकांना कर्ज पुरवितें आणि भक्कम बँकिंग पद्धति रूढ करण्यासाठीं त्यांच्या कार्यावर नियंत्रण ठेवतें.

( क ) कर्जावर नियंत्रण घालून जरूर तेथें बाजारावर प्रत्यक्ष वजन आणून निरनिराळ्या मार्गांनीं ही बँक शक्य तितक्या प्रमाणांत बाजारावर नियंत्रण ठेवते.

( ड ) देशांतील चलनी नोटा काढण्याचा अधिकार फक्त याच बँकेस असतो.

( इ ) ही बँक मध्यवर्ती आणि राज्यसरकारांना आर्थिक बाबींसंबंधीं सल्ला देते.

### ग्रामीण पतव्यवस्था

हीं सर्व कामें रिझर्व्ह बँक करीत असते. यांच्या जोडीस भारतांतील शेतकऱ्यांच्या खास समस्या लक्षांत घेऊन या बँकेनें आपल्या कार्यक्षेत्रांत वाढ करून ग्रामीण पतव्यवस्थेचाही त्यांत समावेश केला आहे. परंतु ही जबाबदारी फार मोठी असून शेतकीसाठीं कर्ज देण्यासंबंधींची तिची कामगिरी नजरेंत भरण्यासाठीं बराच कालावधी जावा लागेल. या दिशेनें आरंभ झाला असून तूर्त रिझर्व्ह बँकेंत शेतकीविषयक पतपद्धतीच्या पाहणीचें काम चालू आहे. तसेंच खेड्यांतील सहकारी बँका आणि सहकारी संस्था यांचे मार्फत कर्ज देण्याकरतां उपाययोजना शोधून काढण्यांत येत आहेत.

### भारतांत बँकांचें अत्यल्प प्रमाण

भारतांतील बहुसंख्य खेड्यांत बँकेसंबंधीं कांहींच माहिती नसते तर शहरांत बँकिंग पद्धतीचा थोडाफार विकास झालेला आहे. अशा या विषम परिस्थितीमुळें आर्थिक घडीवर सतत लक्ष ठेवण्यासाठीं एकाद्या लवचिक बँकिंग पद्धतीची जरूरी आहे. भारतांत ५२४ बँकांच्या एकूण ( शिड्यूल्ड आणि नॉन शिड्यूल्ड धरून ) ४४०० कचेऱ्या आहेत. या कचेऱ्यांची प्रामुख्यानें शहरांत व मोठ्या गांवांतच गर्दी झाली असून, ग्रामीण विभागांना त्यांपासून कांहींच फायदे मिळत नाहींत. याशिवाय एकेका कचेरीचा उपयोग करणाऱ्या लोकांची संख्या फार मोठी म्हणजे ८९,००० इतकी असते. इंग्लंड आणि अमेरिका यासारख्या देशांत ही संख्या अनुक्रमें पांच हजार व साडे सात हजार अशी असते. त्या मानानें पाहतां भारतांत बँकांचें प्रमाण फारच कमी आहे.

### विकासासाठीं आवश्यक गोष्टी

तथापि बँकिंग क्षेत्रांतील विकास कांहीं एका दिवसांत होणें शक्य नाहीं आणि यामुळें ( अ ) विकास होत आहे आणि ( ब ) तो योग्य पायावर होत आहे हें पाहण्याची जबाबदारी रिझर्व्ह बँकेवर आहे. गेल्या महायुद्धांत घाईघाईनें झालेली बँकांची वाढ आणि त्यानंतर विशेषतः पश्चिम बंगाल व पंजाबमध्यें बुडालेल्या बँकांचा विचार करतां अशा तऱ्हेची उपाययोजना करणें अत्यावश्यकच ठरतें. कांहीं ठिकाणीं बँकांची भरमसाट संख्या तर कांहीं ठिकाणीं त्यांचा संपूर्ण अभाव ही परिस्थिति टाळण्यासाठीं नियोजित विकासाची आवश्यकता आहे. नवीन शाखा चालविण्यासाठीं शिक्षित माणसें उपलब्ध असलीं पाहिजेत आणि त्याहूनही महत्त्वाची गोष्ट अशी कीं बँका म्हणजे निढळाच्या घामानें मिळविलेला आपला पैसा सुरक्षितपणें ठेवण्याचें साधन आहे या भावनेची लोकांच्या मनांत वाढ व जोपासना झाली पाहिजे.

### ठेवीदारांचा विश्वास—जागरूकतेची आवश्यकता

लोकांच्या मनांत या वृत्तीस उत्तेजन देण्याचा खात्रीचा मार्ग म्हटला म्हणजे सध्यां अस्तित्वांत असलेल्या बँका कार्यक्षम रीत्या चालवून त्या बुडणार नाहींत असें पाहणें व ठेवीदारांच्या विश्वासास बिलकुल धक्का बसणार नाहीं हें पाहणें कोणत्याहि बँकेचें अग्रदीं प्राथमिक कार्य आहे. बँकिंग पद्धतीचें अज्ञान अगर व्यवस्थापकवर्गाची अफरातफर यांमुळें बुडणाऱ्या बँकांचें प्रमाण शक्य तितकें कमी करून ठेवीदारांच्या हितसंबंधाचें रक्षण करण्याकरितां

बँकांच्या कामकाजावर सतत देखरेख करणें हा रिझर्व्ह बँकेचा हेतु आहे.

हें काम कठीण असून सतत प्रयत्न व कायम जागरूकतेची आवश्यकता आहे. देशांत नोंदणी केलेल्या बँकांची एकूण संख्या ५२४ असून त्यांत ९३ शेड्यूल्ड व ४३१ नॉन-शेड्यूल्ड बँका आहेत. या सर्व बँकांची एकूण संपत्ति १०८६·८२ कोटी रुपये असून ही रक्कम भारताच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या १/७ आहे. या सर्व बँका विकासाच्या निरनिराळ्या अवस्थांत आहेत. यांत पहिला क्रम इंपिरियल बँक ऑफ इंडियाचा असून त्या बँकेची एकूण संपत्ति २४७·४५ कोटी रुपये आहे तर शेवटचा क्रमांक म्हैसूर राज्यांतील एका नॉन्-शेड्यूल्ड बँकेचा असून त्या बँकेची एकूण संपत्ति १२,००० रुपये आहे. या सर्व बँकांकडे लक्ष द्यावें लागतें.

### रिझर्व्ह बँकेच्या आणखी शाखांची जरूरी

रिझर्व्ह बँकेनें आपल्या अस्तित्वाच्या अल्पकालांत अनेक अवस्थांतून प्रगति केली असली तरी अशा प्रकारची जबाबदारी घेण्याचे दृष्टीनें ती अजून तेवढी सुसज्ज झालेली नाहीं. तिची मुख्य अडचण म्हटली म्हणजे तिचा अजून सर्व देशभर विस्तार झालेला नाहीं. मुख्य कचेरी व मुंबईतील एक शाखा सोडून या बँकेच्या केवळ कलकत्ता, मद्रास, दिल्ली व कानपूर येथेंच काय त्या चार कचेऱ्या आहेत. मुंबईशिवाय तिची स्वतःची अशी इमारत दुसरीकडे कोठें नाहीं. कलकत्त्यांत बँकिंग खातें असलेली इमारत तेवढी रिझर्व्ह बँकेच्या मालकीची आहे व बाकीचीं खातीं भाड्यानें घेतलेल्या जागेंत आहेत. रिझर्व्ह बँकेस तिचा प्रभाव पाडण्याचे दृष्टीनें किमान पक्षीं निरनिराळ्या राज्यांच्या राजधान्यांत आणि महत्त्वाच्या आर्थिक आणि व्यापारी ठिकाणीं स्वतःच्या शाखा असणें आवश्यक आहे.

### अधिकारी व सेंट्रल बोर्ड

रिझर्व्ह बँकेचे सर्वाधिकारी गव्हर्नर श्री. बेनिगल रामराव असून त्यांस श्री. एन्. सुंदरेसन व श्री. रामनाथ हे दोन डेप्युटी गव्हर्नर सहाय्यक आहेत. श्री. सुंदरेसन ह्यांच्या सध्याच्या रजेच्या मुदतींत श्री. जे. व्ही. जोशी ह्यांची डेप्युटी गव्हर्नर म्हणून नेमणूक झाली आहे. बँकेच्या व्यवस्थेची जबाबदारी यांच्यावर असते. या बँकेस सर्वसाधारण दिग्दर्शन आणि नियमन करण्याचें काम भारत सरकारनें नेमलेल्या बोर्ड ऑफ डायरेक्टरांकडे असतें. पश्चिम, पूर्व, उत्तर आणि दक्षिण विभागांच्या स्थानिक बोर्डांतील प्रत्येकीं एक याप्रमाणें यांतील चार डायरेक्टर नियुक्त असतात, तर आणखी एक सरकारी अधिकारी असतो. या चारही विभागांची केंद्रस्थानें अनुक्रमें मुंबई, कलकत्ता, दिल्ली व मद्रास या ठिकाणीं आहेत. बँकेचे मुख्य अधिकारी गव्हर्नर व दोन डेप्युटी गव्हर्नर यांची नेमणूक भारत सरकारकडून होते. सेंट्रल बोर्डांत पुढील लोक आहेत:—

गव्हर्नर:— श्री. बेनिगल रामराव.

डेप्युटी गव्हर्नर:— श्री. सुंदरेसन, श्री. रामनाथ.

डायरेक्टर:—श्री. पुरुषोत्तमदास ठाकुरदास, श्री. बी. एन्. बिर्ला, श्री. श्रीराम, श्री. सी आर. श्रीनिवासन, श्री. माणिलाल बी. नानावटी, श्री. जे. आर. डी. टाटा, श्री. धीरेंद्रनाथ सेन, श्री. बी. डी. व्ही. रामस्वामी नायडू, श्री. साहू जगदीश प्रसाद, श्री. धनंजयराव गाडगीळ, श्री. के. जी. आंबेगांवकर, आय्. सी. एस्. चिटणीस मध्यवर्ती अर्थखातें ( डिपार्टमेंट ऑफ एकॉनॉमिक अफेअर्स ).

### चलनी नोटा व त्यांस आधार

देशाची मध्यवर्ती बँक या नात्यानें रिझर्व्ह बँकेसच केवळ नोटा काढण्याचा अधिकार आहे. हें कार्य तिच्या 'इश्यू' खात्यामार्फत केलें जातें. या खात्याची संपत्ति बँकेच्या इतर खात्यापासून वेगळी ठेविली आहे. यापैकीं कमींत कमी ४० टक्के संपत्ति सोन्याची नाणीं, सोनें किंवा परकीय हुंडणावळीचे रोखे यांच्या स्वरूपांत असलीच पाहिजे. मात्र पहिल्या दोन वस्तूंची किंमत कमींत कमी ४० कोटी रुपये असली पाहिजे. १९३५ सालीं रिझर्व्ह बँकेनें नोटा तयार करावयाचें काम प्रथम हातीं घेतलें त्यावेळीं वापरांत असलेल्या नोटा जास्तींत जास्त १६७ कोटी रुपये किंमतीच्या होत्या. आतां त्यांची किंमत गेल्या महायुद्धांत मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्यामुळें ११०० कोटी रुपयांहूनहि अधिक आहे. सध्यां सुवर्ण नाणीं आणि सोनें यांची किंमत ४० कोटी रुपयांच्या कायदेशीर पातळीच्या जवळपास असून नोटा तयार करण्यास परदेशीय व रुपयांच्या रोख्यांचा मुख्य आधार आहे. १० सप्टेंबर १९५२ रोजीं संपलेल्या आठवड्याच्या रिझर्व्ह बँकेच्या पत्रकावरून इश्यू डिपार्टमेंटची संपत्ति ११२४·२७ कोटी रुपयांची असून त्यापैकीं ४०·०१ कोटींचीं सुवर्णनाणीं व सोनें, ९३८·१५ कोटी रुपये किंमतीचे परदेशीय रोखे, ८१·४७ कोटी रुपये किंमतीचीं रुपयांचीं नाणीं आणि ४६४·६३ कोटी रुपयांचे भारत सरकारचे रोखे असल्याचें दिसून येतें.

### सरकारची बँकर

सरकारची बँकर हें मध्यवर्ती बँकेचें अत्यावश्यक कार्यही रिझर्व्ह बँक करते. मध्यवर्ती व राज्यसरकारच्या वतीनें ही बँक पैसे स्वीकारते व देते व बँकेचीं करावीं लागणारीं इतर कार्यें ती स्वतः अगर स्वतःची कचेरी नसेल तेथें इंपिरियल बँक ऑफ इंडिया मार्फत करते. या दररोज होणाऱ्या कोट्यावधी रुपयांच्या देवघेवीच्या व्यवहाराबद्दल या बँकेला कांहींच मोबदला मिळत नाहीं. या बँकेच्या मुंबई कचेरींत १ ऑगस्ट १९५२ रोजीं झालेल्या देवघेवीच्या व्यवहारांत १·२६ कोटी रुपये जमा झाले व १·५७ कोटी रुपये द्यावे लागले. सार्वजनिक कर्जाच्या व्यवस्थेबद्दल या बँकेला दर सहामाहीस दलाली मिळते.

### अप्रत्यक्ष आर्थिक नियंत्रण

खुल्या बाजारांतील व्यवहारामार्फत बऱ्याच मोठ्या प्रमाणांत रिझर्व्ह बँक कर्जावर प्रत्यक्ष नियंत्रण ठेवूं शकत नसली तरी सामान्यपणें शिड्यूल्ड बँकांमार्फत देशाच्या आर्थिक व पतपद्धतीवर ती नियंत्रण ठेवते. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ॲक्ट व १९४९ चा बँकिंग कंपनीज ॲक्ट या कायद्यान्वयें या बँकेला कारभार व व्यवहार दोन्ही बाबतींत नियंत्रण ठेवण्यास अधिकार मिळालेले आहेत.

### बँक रेटमध्यें वाढ

हुंडीची खरेदी अगर पुनर्वटाव यासाठी रिझर्व्ह बँकेनें ठरविलेला बँक रेट म्हणजे कर्जनियंत्रणाचें महत्त्वाचें साधन होय. रिझर्व्ह बँकेनें अलिकडेच चलनवाढप्रतिबंधक उपाय म्हणून बँक रेट ३ टक्क्यांवरून वाढवून ३॥ टक्के केला. या बँकेनें भारतांतील हुंडी बाजाराच्या वाढीसाठींहि कांहीं उपाययोजना केल्या आहेत.

रिझर्व्ह बँकेच्या इतर कामांत ग्रामीण अर्थव्यवस्था सावरून धरण्याच्या हेतूनें शेतकीसाठी कर्जाची तरतूद, देशाच्या परकीय हुंडणावळीवर देखरेख आणि सरकार व व्यापारी जनता यांच्या उपयोगासाठीं आर्थिक माहिती व आंकडेवारी विभागाची तरतूद यांचा समावेश होतो.

## मॅट्रिक व पदवीधर ह्यांतील बेकारी

मे, १९५२ अखेर, एम्पॉलयमेंट एक्सचेंजेसच्या पटावरील ३,६६,५९२ बेकारांपैकीं १४,८२८ बेकार पदवीधर व १,०१,०३८ बेकार मॅट्रिक-पास होते. मद्रास, उत्तर प्रदेश प. बंगाल, मुंबई व दिल्ली येथें पदवीधर बेकारांची संख्या मोठी आहे. मद्रास येथें सर्वांत ज्यास्त बेकार मॅट्रिकांनीं नोकरीसाठीं नोंद केलेली आहे. नोंदलेल्या बेकार मॅट्रिकपैकीं व बेकार पदवीधरांपैकीं अनुक्रमें २७% व ५०% मुंबई दिल्ली, मद्रास व कलकत्ता ह्या शहरांत केंद्रित आहेत. खालील तक्त्यांत तपशील दिला आहे:—

| विभाग | मॅट्रिक | एक किंवा अधिक पदवी असलेले पदवीधर | | | | एकूण पदवीधर व मॅट्रिक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | इंजिनिअरिंग | वैद्यक | इतर विषय | एकूण | |
| आसाम | १,६७१ | १ | ३ | १९९ | २०३ | १,८७४ |
| बिहार | ५,००८ | १३ | १४ | ६७४ | ७०१ | ५,७०९ |
| मुंबई | १७,०८३ | ८४ | १९ | २,०१० | २,११३ | १९,१९६ |
| दिल्ली, अजमीर, राजस्थान | ९,३२३ | ६० | २७ | २,२२७ | २,३१४ | ११,६३७ |
| हैद्राबाद | १७,७९ | १५ | २ | २९४ | ३११ | २०,९० |
| मध्यप्रदेश | ३,८९७ | ८ | १ | ५०६ | ५१५ | ४,४१२ |
| मद्रास | २०,९८५ | ४५ | १० | २,००० | २,०५५ | २,३०४० |
| ओरिसा | ८९२ | ४ | १ | १७६ | १८१ | १,०७३ |
| पंजाब | ६,२३६ | ११ | १७ | ६९६ | ७२४ | ६,९६० |
| उत्तर प्रदेश | १८,२६७ | ३४ | १३ | २,३४२ | २,३८९ | २०,६५६ |
| प. बंगाल | १५,८९७ | २८८ | १२० | २९,१४ | ३,१२२ | १९,२८९ |
| भारत | १,०१,०३८ | ५६३ | २२७ | १४,०३८ | १४,८२८ | १,१५,८६६ |

### धूतपापेश्वर इंडस्ट्रीज लि.

वरील कंपनीनें १९५१ मध्यें २०,३१,०९६ रुपयांची विक्री केली. सर्व खर्च भागवून व ३०,५९२ रु. घसारा काढून कंपनीस १,३४,४३६ रु. निव्वळ नफा उरला. ६५,००० रु. ची कराची तरतूद करून ६% करमाफ डिव्हिडंड देण्याचें ठरलें. कंपनीच्या औषधांचा खप सालोसाल वाढत आहे, परंतु मजुरी व बोनस ह्यांतील वाढीमुळें निव्वळ नफ्याचा आंकडा वाढत जाऊं शकला नाहीं. कंपनीचें वसूल भांडवल सुमारें ९३/४ लक्ष रु. आहे आणि एकूण ताळेबंद सुमारें २१ लक्ष रुपयांचा आहे. कंपनीची वार्षिक सभा ९ सप्टेंबर रोजीं झाली, त्यावेळीं चेअरमन, श्री. पु. ब. गोळे, ह्यांनीं केलेलें भाषण ह्याच अंकांत इतरत्र दिलें आहे.

### मास्को: पांच समुद्रांस जोडलेलें बंदर!

युरोपांतील सर्वांत मोठी नदी व्होल्गा (२,३२५ मैल) आणि डॉन नदी (१,३२५ मैल) ह्यांस जोडणारा कालवा २७ जुलै, १९५२ रोजीं सुरू झाला. ह्या कालव्याच्या व्होल्गा टोकावर स्टॅलिनचा २०० फुटी तांब्याचा पतळा उभारण्यांत आला आहे. व्होल्गा-डॉन कालव्याची लांबी ६२.७ मैल असून खोली १५ फूट आहे. पनामा आणि सुएझ कालव्यांतून सध्या होणाऱ्या वहातुकीपेक्षां ह्या कालव्यांतून वहातुक कालांतरानें ज्यास्त होईल, असें म्हटलें जातें. आतां मॉस्को शहर हें पांच समुद्रांस जोडलें गेलेलें बंदर झालें आहे! ह्या कालव्यामुळें रशिअन रेल्वेवरील वहातुकीचा ताण पुष्कळ कमी होणार आहे.

### बक्षीस!

हॅंबर्ग येथें "आदर्श वधूवरां" स बक्षिसें देण्यांत आलीं. त्यांत एका वकिलाचें एक सर्टिफिकेट होतें. वधूवराच्या पहिल्या घटस्फोटाबाबत मोफत सल्ला मिळेल, असें त्यांत आश्वासन दिलेलें होतें.

### चंदनाच्या तेलाचा कारखाना

कूर्ग संस्थानांत लवकरच चंदनाचें तेल गाळण्याचा एक कारखाना उघडण्याचें घाटत आहे. हा कारखाना फ्रेझरपेट येथें उभारण्यांत यावयाचा आहे. कांहीं खाजगी भांडवलदारांनीं सरकारला एक योजना सादर केली असून सरकारनें कांहीं सवलती देण्याचेंही कबूल केल्याचें समजतें. सध्यां कूर्ग संस्थानांत म्हणण्यासारखे उद्योगधंदे नाहींत. तेव्हां वरील कारखाना निघाल्यास तो संस्थानाच्या औद्योगीकरणांतील पहिलें पाऊल ठरण्याचा संभव आहे. कूर्गमध्यें दरवर्षी सुमारें १०० टन चंदनाचें लाकूड निघतें. पण तें सर्व तेल काढण्यासाठीं म्हैसूर, कूपम् आणि राजस्थानमधील कनोज ह्या ठिकाणीं धाडण्यांत येतें. ह्या लाकडाच्या लिलांवांत सर्व व्यापाऱ्यांनीं मिळून किंमती पाडून मागितल्यानें कूर्गच्या सरकारला लाकडाची विक्री चालू सालीं करतां आलीच नाहीं. लांकूड मातीमोलानें विकण्यानें फारच तोटा होणार होता. अखेर सरकारनें म्हैसूर सरकारच्या मदतीनें कांहीं लांकूड विकलें. त्याची किंमत योग्य भावानें सुमारें ३ लाख रुपये आली. व्यापाऱ्यांनीं आपआपसांत केलेल्या मसलतीच्या आहारीं जावयाचें नाहीं असा निश्चय कूर्ग सरकारनें केला असून जरूर पडल्यास पुढेंही म्हैसूर सरकारच्या मदतीनें चंदनाची विल्हेवाट लावण्याचें ठरविलें आहे. फ्रेझरपेट येथें चंदनाच्या तेलाचा कारखाना निघाल्यास हें सर्व लांकूड कारखान्याला पुरवितां येईल आणि त्यामुळें चंदनाच्या लाकडाला निश्चित बाजारपेठ मिळून त्याला वाजवी किंमतही मिळेल. त्याशिवाय, लांकडाचा पुरवठा करण्याचें सरकारच्या हातीं राहिल्यानें किंमती योग्य पातळीवर राखण्याच्या कामीं सुद्धां सरकारहि कांहीं प्रयत्न करूं शकेल.

### सौराष्ट्रांतील इस्पितळाला देणगी

महुआ ह्या सौराष्ट्रांतील गांवची नगरपालिका एक इस्पितळ बांधणार आहे. इमारतीसाठीं व इस्पितळाच्या सामुग्रीसाठीं एका दानशूर व्यापाऱ्यानें १,००,००० रुपयांची देणगी दिली आहे. त्याशिवाय २५,००० रुपयांची आणखी एक देणगी व इतर छोट्या देणग्याहि मिळणार आहेत.

दि
प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.
( शिडयूल्ड बँक )
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

अधिकृत, विक्रीस काढलेलें
व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल रु. ७,१९,४८५
खेळतें भांडवल रु. ७५,००,०००

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर
बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी.,
मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर.

॥ श्री ॥

दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

— लोकमान्यांचें बोधवाक्य —
॥ मामनुस्मर युध्य च ॥

नवीन १००० टनांची सेमि-इलेक्ट्रिक मशिनरी उभी होऊन कंट्रोल दरानें सुमारें सत्तर लक्ष रुपयांची साखर चालू हंगामांत तयार झाली.

याचप्रमाणें पुढें दरवर्षी साखरेचें उत्पादन होत जाणार. वीरचें धरण होऊन आणखी दोन हजार एकरांस पाणी मिळालें म्हणजे उत्पादन आजच्यापेक्षां दुप्पट होणार.

साखरविक्रीच्या विलंबामुळें एक वर्ष मुदतीच्या नवीन ठेवी घेण्याचें ठरविलें आहे. सदर ठेवी हंगामाच्या साखर-विक्रींतून मुदतीप्रमाणें परत केल्या जातील. नवीन हंगाम नोव्हेंबरमध्यें सुरू होईल.

शेअरविक्री सुरू आहे.

शेअर व ठेवींचे फॉर्म पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

९८० सदाशिव पेठ,
कॉमनवेल्थ बिल्डिंग, लक्ष्मी रोड,
पुणें २.
दि. १० सप्टेंबर १९५२.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एलएल. बी.,
सी. जी. आगाशे अँड को.,
मॅनेजिंग एजंट्स.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.